महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम २००५ अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणी करीता मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली टास्कफोर्स गठीत करण्याबाबत

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांकःमग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.४६/रोहयो-१०
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २५ मे २०१०.

## शासन निर्णय

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना अधिनियम २००५ अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीत सुधारणा करणे, तसेच सदर योजना राज्यात प्रभावीपणे राबविणे, केंद्रिय निधीचा पर्याप्त वापर करणे, सध्याच्या व्यवस्थेतील दोष दूर करणे व आवश्यक असल्यास धोरणात्मक बदल करणे, त्याबाबत सूचना करण्याकरीता दिनांक ४ मार्च २०१० च्या आदेशान्वये मंत्रिमंडळाची उप समिती गठीत करण्यात आली होती.

२. सदर मंत्रिमंडळ उप समितीने केलेल्या शिफारशींवर निर्णय घेण्याकरीता मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. दिनांक १२ मे २०१० रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमधील निर्णयानुसार महाराष्ट्र रोजगार हमी योजनेचा वेळोवेळी आढावा घेणे व आवश्यक बदल करणे यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे टास्कफोर्स स्थापन करण्यात येत आहे:-

| | |
|---|---|
| मा. मुख्य सचिव | अध्यक्ष |
| प्रधान सचिव, वित्त | सदस्य |
| प्रधान सचिव, रोहयो | सदस्य |
| प्रधान सचिव, ग्राम विकास | सदस्य |
| प्रधान सचिव, कृषी | सदस्य |
| विभागीय आयुक्त, औरंगाबाद | निमंत्रीत सदस्य |
| जिल्हाधिकारी, नांदेड | निमंत्रीत सदस्य |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, नंदूरबार | निमंत्रीत सदस्य |
| उप सचिव (रोहयो) | सदस्य सचिव |

W56
कार्यकारी अभियंता
रोजगार हमी योजना शाखा
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय रत्नागिरी
- 9 JUN 2010
संकलन
उपजिल्हाधिकारी (रोहयो) रत्नागिरी
- 7 JUN 2010
कार्य विवरण नं.
प्र. लि.

३. रोजगार हमी योजनेंतर्गत अस्तित्वात असलेले शासन निर्णयाचा सातत्याने आढावा घेणे व आवश्यकतेनुसार शासनाच्या धोरणामध्ये बदल सुचविण्यासाठी निर्णय प्रक्रियेमध्ये वेळ कमी करण्यासाठी उपरोक्त टास्क फोर्स निर्णय घेईल. जेणेकरुन आवश्यकतेनुसार झपाटयाने निर्णय घेणे शक्य होईल. या टास्क फोर्सने घेतलेल्या निर्णयांची माहिती वेळोवेळी मा. मंत्री (रोहयो) यांना सादर करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( बा.बा.नारायणकर )
उप सचिव (रोहयो)

प्रति,

१) मा.राज्यपालांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव
५) सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक,
७) प्रधान सचिव, वित्त विभाग
८) प्रधान सचिव, रोहयो
९) प्रधान सचिव, कृषी विभाग
१०) सचिव, ग्राम विकास विभाग
११) विभागीय आयुक्त, औरंगाबाद
१२) जिल्हाधिकारी, नांदेड
१३) मुख्य कार्यकारी अधिकारी, नंदूरबार
१४) उप सचिव (रोहयो)
१५) सर्व विभागीय आयुक्त,
१६) सर्व जिल्हाधिकारी
१७) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१८) समिती अधिकारी, कार्यासन ड-७, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१९) रोहयो प्रभागातील सर्व कार्यासने
२०) निवडनस्ती, रोहयो-१०.

रोहयो